S.M.R.K.-B.K.&A.K. MAHILA MAHAVIDYALAYA

ESTD - 28th June 1985

CENTENARY 1918 - 2018 CELEBRATIONS

Above Self... Above Politics

# महर्षी सर डॉ. मो. स. गोसावी संगीत महोत्सव



रविवार, दि. १५ सप्टेंबर २०२४ रोजी सायं. ५.३० वा.

स्थळ : गुरुदक्षिणा सभागृह, गोखले एज्युकेशनचे कॅम्पस, श्रद्धा पेट्रोलपंपासमोर, कॉलेजरोड, नाशिक-५.



**सप्रेम नमस्कार !**

जसा अमृतानंद देणाऱ्या गायकीत हृदयातून राग यावा लागतो... अन् तो जर हृदयातून आला तरच रसिकांच्या काळजाला भिडतो. तद्वत शिक्षणाच्या अंगणात **गानसम्राज्ञी लता मंगेशकर** यांच्या हस्ते श्री विद्या सरस्वती पुरस्कार स्वीकारण्याचा सन्मान प्राप्त झालेले **ज्ञान चक्रवर्ती सर डॉ. श्री. मो. स. गोसावी** यांनी बुद्धीच्या तारमंडलावर देवी सरस्वतीचा राग छेडला आणि नवनवे विक्रम स्थापन केलेत. ज्ञानचक्रवर्ती महर्षी सर डॉ. मो. स. गोसावी सरांच्या जन्मदिनी गेली अनेक वर्षे एस.एम.आर.के. महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे सर डॉ. मो. स. गोसावी संगीत महोत्सव आयोजित करण्यात येतो. या महोत्सवासाठी दर वर्षी सरांची उपस्थिती आणि शाबासकीची थाप आम्हाला नवी ऊर्जा द्यायची. आता सर देह रुपाने नसले तरी त्यांचे विचार आणि कार्यातून आपल्यातच आहेत. त्यांच्या पवित्र स्मृती आजही आपल्यासाठी प्रेरक आहेत.

**हा संगीत महोत्सव म्हणजे सरांना आदरपूर्वक समर्पित केलेली स्वरांजली आहे.**

रसिकांची अभिजात अभिरुची समृद्धतेने सांभाळणाऱ्या या दिग्गजांच्या गाण्यांच्या, स्वर बंधांनी अवघे नाशिककर चिंब भिजतील, असा हा अवर्णनीय अनुभव... ताल, लय, सूर, शब्द, गायकीचा अमृतानंद. आपण या सोहळ्याची रंगत वाढविण्यासाठी अगत्य यावं, त्यातून हे गुरूशिष्यामधले भावस्वरांचं नातं अधिक फुलेल. दर वर्षी समस्त संगीतानुरागी नाशिककर ज्या स्वर महोत्सवाची आतुरतेने प्रतीक्षा करतात तो सर डॉ. मो. स. गोसावी संगीत महोत्सव म्हणजे स्वर, ताल आणि लय यांची अद्वितीय अनुभूती!

हा संगीत महोत्सव म्हणजे आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि व्यवस्थापन तज्ज्ञ महर्षी सर डॉ. मो. स. गोसावी तसेच एस.एम.आर.के. महिला महाविद्यालयाच्या संस्थापिका प्राचार्या डॉ. सौ. सुनंदाताई गोसावी यांचे कृतज्ञ स्मरण! हा संगीत महोत्सव म्हणजे वैविध्यपूर्ण गायन शैली असणाऱ्या नामवंत गायकांच्या स्वरांचे माधुर्य अनुभवणाऱ्या रसिकांसाठी जणु पर्वणीच! यासाठी समस्त नाशिककरांना आग्रहाचे निमंत्रण!

## लता मंगेशकर यांच्या
## ९५ व्या जन्मदिनानिमित्त
## "मेरी आवाज ही पहचान है"!
## (Some milestones of Lata Mangeshkar)

**सादरकर्त्या : सौ. रागिणी कामतीकर**
**तबला : आदित्य कुलकर्णी**
**सुसंवाद : स्मिता मालपुरे**



**संस्थापक आयोजक**

**डॉ. सौ. दीप्ती देशपांडे**

(सचिव, खजिनदार व मानव संसाधन संचालिका, गोखले एज्युकेशन सोसायटी)

**निमंत्रक**

**डॉ. सौ. संध्या खेडेकर**

(प्राचार्या, एस.एम.आर.के.-बी.के.-ए.के. महिला महाविद्यालय)

**प्रो. डॉ. नितीन सोनगीरकर** (उपप्राचार्य)

**संयोजक**

**डॉ. अविराज तायडे**

(समन्वयक कला व ललित कला शाखा व संगीत विभाग प्रमुख)

**एस.एम.आर.के.-बी.के.ए.के. महिला महाविद्यालय**

**सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वृंद**